# प्रा.डॉ.चारुता गोखले - निरोप समारंभ

मू.जे.महाविद्यालयात मराठी विभागाच्या प्रा.डॉ.चारुता गोखले या ३६ वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्यात. त्यानिमित्ताने त्यांचा निरोप समारंभ पार पडला.



यावेळी कलाशाखेचे उपप्राचार्य डॉ. सुरेश तायडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ.विद्या पाटील, डॉ.सी.पी.लभाणे, डॉ.गौरी राणे, प्रा.गोपीचंद धनगर यांनी भावना व्यक्त केल्या. प्रा.चारुता गोखले यांनी यावेळी, महाविद्यालयाने भरभरून प्रेम दिले. विद्यार्थ्यांची मने जिंकली, ३६ वर्षांच्या सेवेत प्रेमळ माणसे मिळाली अशा भावना व्यक्त केल्या.

सूत्रसंचालन व आभार प्रा.विजय लोहार यांनी केले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.